# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०३/०३/२०२५ अनु.क्र. ४२

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/से.नि.पु.रजा/२०४८ /२०२५अमरावती शहर दिनांक २५/०२/२०२५**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार असल्याने त्यांनी सेवानिवृतिपुर्व रजा मंजुरी बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

| अ.क्र. | अंमलदारांचे नाव,पदनाम,ब.न | नेमणुक | नियत वयोमानाने सेवानिवृत्त दिनांक | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/१२४६, संजय अधापुरे | पो.स्टे.गाडगेनगर | दि.३०/०६/२०२५ | ३० दिवस |
| २ | श्रेपोउपनि/१२७१,विजय ढोके | पो.स्टे.गाडगेनगर | दि.३०/०६/२०२५ | ३० दिवस |
| ३ | सपोउपनि/०१,अशोक खांडेकर | पो.स्टे.कोतवाली | दि.३१/०५/२०२५ | ३० दिवस |
| ४ | श्रेपोउपनि/१४९५,विलास रामेकर | पो.स्टे.फ्रेजरपुरा | दि.३१/०८/२०२५ | ३० दिवस |
| ५ | श्रेपोउपनि/७१६,रत्नाकर अळसपुरे | शवाशा पुर्व | दि.३१/०८/२०२५ | ३० दिवस |
| ६ | पोहवा/१००३,राजेश ढोके | पोलीस मुख्यालय | दि.३१/०७/२०२५ | ३० दिवस |
| ७ | श्रपोउपनि/९५२,भास्कर राऊत | पोलीस मुख्यालय | दि.३१/०५/२०२५ | ३० दिवस |
| ८ | पोहवा/१००२,मोहन धोंडे | पो.स्टे.नांदगाव पेठ | दि.३०/०६/२०२५ | ३० दिवस |
| ९ | पोहवा/११४६,शामराव मोरे | पो.स्टे.फ्रेजरपुरा | दि.३१/०५/२०२५ | ३० दिवस |

उपरोक्त पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६६(१)तरतुदीनुसारआणि प्रशासकीय कामाची निकड व त्यांचे सेवेची आवश्यकता विचारात घेवुन वरील प्रमाणे सेवानिवृत्तीपुर्व रजामंजुर करण्यात येत आहे.तरी त्यांना यापुढे रजा वाढवुन देण्यात येणार नाही हयाची नोंद घ्यावी.

**२.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/२०६८/२०२५अमरावती शहर दिनांक २५/०२/२०२५**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुती ची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१९०६, वैशाली राऊत (पाटील) | पो.स्टे. वलगाव | दि.१४/१०/२०१६ | दुसरी | दि१०/०५/२०२५ | १ |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**३.पोआअ/आस्था-५/रोखीकरण/२०५७ /२०२५अमरावती शहर दिनांक २५/०२/२०२५**

**संदर्भ:-** १. शासन निर्णय,गृह विभाग, क्र एलव्हीई-२००२/प्रक्र.५४६/पोल-५(ब), दिनांक २७/०२/२००४
२. शासन पत्र,गृह विभाग,क्र एलव्हीई-२००३/प्रक्र.५४६/पोल-५ (ब), दिनांक १०/०४/२००७

**विषय:-** सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता १५ दिवस अर्जित रजेचे प्रत्यार्पन मंजुरीबाबत.

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांना सन २०२४-२०२५ करीता १५ दिवस अर्जित रजेचे प्रत्यार्पन करुन त्याचे रोखमुल्य शिल्लक अर्जित रजेमधुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | अंमलदाराचे पदनाम/ब.न./नाव | नेमणुक | शिल्लक रजा |
|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/८७२, सतिष देशमुख | पोलीस मुख्यालय | १५ अर्जित रजेचे प्रत्यार्पन |
| २ | मपोशि/१७२८, शितल सावरकर | पोलीस मुख्यालय | १५ अर्जित रजेचे प्रत्यार्पन |

सदरचा खर्च "२०५५-पोलीस-१०९ जिल्हा पोलीस-(००)(०१) जिल्हा पोलीस दल-वेतन" व "२०५५-पोलीस-१०८ राज्य मुख्यालय पोलीस-(०२) शहर पोलीस (०२) (०१) आस्थापना" या लेखाशिर्षाखालील मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/प्रशि./MPA/Inv.Women Safety/२१०६ /२०२५अमरावती शहर दिनांक २५/०२/२०२५**

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक, तथा संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र

क्र. मपोअ /प्रशि-५/ सेवा. प्रशिक्षण/BPR&D/ सत्र क्र.२/२०२५/१५२३
दिनांक २०.०२.२०२५

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित केलेबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महाराष्ट्र पोलीस ॲकडमी, नाशिक येथे Training of Investigator on Women Safety या विषयावर दि. ०३.०३.२०२५ ते ०७.०३.२०२५ या कालावधीत ५ दिवसांचे प्रशिक्षण सत्र आयोजित केलेले आहे. सदर प्रशिक्षण सत्रास प्रत्येक आयुक्तालयातील (PSI to ACP) दर्जाचे ०१ पोलीस अधिकारी यांचे नामनिर्देशन पाठविणेबाबत सुचित केले आहे.

त्यानुषंगाने पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकातुन सदर प्रशिक्षणाकरीता खालिल पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात आलेली आहे.

| Sr. no. | NAME OF OFFICER | RANK | POSTING | MOBILE NO | E-MAIL ID | SEVARTH ID |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | GAJANAN SONUNE | PSI | P.S. FREJARPURA | 8087190466 | sonunegb@gmail.com | DGPGBSM9001 |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण फी BPR&D यांचेकडून भागविण्यात येत असल्याने सदरचे प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण फी आकारण्यात आलेली नाही आहे.

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. पोलीस अधिकारी यांनी प्रशिक्षण सुरु होण्यापुर्वी एक दिवस अगोदर १७.०० वाजे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर रहावे.
२. संबंधीत प्रशिक्षण विषयावर महत्वाचे केसस्टडीज, विशेष अनुभव असल्यास Presentation Material सोबत न्यावे.
३. प्रशिक्षणाकरीता फक्त प्रशिक्षणार्थींनी उपस्थित राहावे. सोबत पती/पत्नी किंवा लहान मुलांना घेवुन जावु नये.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/सपोउपनि-१३०६सानप+२/६७३ /२०२५अमरावती शहर दिनांक २३/०१/२०२५**

(103)

भाअ/विचौ-१/सपोउपनि-१३०६ सानप+२/अं.आ./673/२०२४ अम. शहर दि.- २२/०१/२०२५
23 JAN 2025

**सदंर्भ :-** क्रं. पोमसं/११/२२/६-कसुरी-पोनि-जाधव व इतर ३/७४/२०२४ दि.३/०९/२०२४
दि.०४/०९/२०२४

**विषय :- अंतिम आदेश**

१) सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप
२) मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके
३) पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण सर्व नेमणूक पोलीस मुख्यालय अमरावती शहर

*****

उपरोक्त संदर्भांकित विषयांच्या अनुषंगाने १) सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप २) मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके ३) पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण, तत्का. नेमणूक पो.स्टे. वलगाव, अमरावती शहर यांचे कसूरीबाबत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून प्राप्त अंतिम आदेशाची प्रत तामील करुन दुय्यम प्रतीवर त्यांनी दिनांकित स्वाक्षरी घेवून सदरची दुय्यम प्रत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयास सादर करण्याकरीता कळविण्यात आले आहे.

तरी सदर अंतिम आदेशाच्या दोन प्रती आपणाकडे पाठविण्यात येत असून मुळ प्रत १) सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप २) मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके ३) पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण, सर्व नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना अदा करुन व दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून सदरची दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.

**सहपत्र -** मा. पोमसं यांचे कडील अंतिम आदेशाच्या ०६ प्रती

23/01/25
(किशोर शेंडे)
**प्रशासकीय अधिकारी**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर
यांचे करिता

**प्रति,**

१) सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप,
२) मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके,
३) पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण, सर्व नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**मार्फत :-**

राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

२/- सदर आदेशाच्या दोन-दोन प्रती आपणाकडे पाठविण्यात येत असून एक-एक प्रत संबंधितास अदा करुन, दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून साक्षांकित दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.

**प्रतीलीपी :-** प्रलि-आस्थापना शाखा/लेखा शाखा/वेतन लिपीक/वेतन निश्चिती लिपीक/भ.नि.नि.लिपीक/सेवापट नोंदणी लिपीक / पोलीस पत्रिका लिपीक यांना माहितीस व आवश्यक त्या योग्य कार्यवाहीस.

D.G.OFFICE LETTER

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : पोमसं/११/२२/६-कसुरी-पोनि-जाधव व इतर ३/७४/२०२४ दिनांक : ई-ऑफीस स्वाक्षरी

संदर्भ :- १. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक : विपोमनि(गुन्हे-पूर्व)/गुअवि/अमरावती/पोस्टे वलगाव/अमृनं/ ३५-२१/कसुरी/९३/२०२२, दि.०२/०२/२०२२ चे पत्र व सोबतचे सहपत्रे

२. सहायक पोलीस आयुक्त, गाडगेनगर विभाग, अमरावती तथा विभागीय चौकशी अधिकारी यांचे क्रमांक : २५१५/२०२३, दि.०५/०५/२०२३ चा समारोप अहवाल

३. या कार्यालयाचे क्रमांक : पोमसं/११-अ/२२/८/कसुरी-पोलीस कोठडी मृत्यू/५८/२०२२, दि.१४/०९/२०२३ चे ज्ञापन व कारणे दाखवा नोटीस

४. सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप यांचे दि.२४/१०/२०२३ चे अभिवेदन

विषय :- **विभागीय चौकशीबाबत..**

१) सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप

२) मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके

३) पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण

सर्व तत्का.नेम. वलगाव पोलीस स्टेशन, जि. अमरावती

*******

**-: अंतिम आदेश :-**

१) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) सपोउपनि/१३०६ मोहन भा. सानप ४) मपोना/१२० ज्योत्सना वा. सोळंके ५) पोहवा/१४५० विष्णू म. चव्हाण ६) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंबे ७) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे हे सर्व पोलीस स्टेशन वलगांव, जि. अमरावती येथे नेमणुकीस असतांना पोलीस स्टेशन अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी करण्यात आली आहे. सदरहू चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये १) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंब ४) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे यांचे प्रकरण बंद करण्यात आले आहे. उर्वरित कसुरदारांपैकी कसुरदार क्र. ३ **सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप** यांचेवर खालीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत :-

दि.२३/०९/२०२१ चे ९.०० वा. ते २१.०० वा. पावेतो डयुटी ऑफीसर डयुटी असतांना त्यांनी खालीलप्रमाणे कसुरी केली :-

१) आरोपी ताब्यात घेतल्याबाबत स्टेशन डायरी नोंद घेतली नाही.

२) आरोपीला योग्य हिफाजतीमध्ये ठेवले नाही.

३) गार्ड नेमून ताब्यात दिले नाही.

त्यामुळे मयत आरोपी यास पंख्याला गळफास घेण्यास संधी मिळाली. करिता सपोउपनि मोहन सानप यांनी आपले कर्तव्य बजावित असतांना हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला.

२. सदर दोषारोपाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप यांना **"त्यांना त्यांचे सद्याच्या सपोउपनि पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षाकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** हि शिक्षा प्रस्तावित केली होती. सदरची कारणे दाखवा नोटीस त्यांना प्राप्त झाली असून, प्रस्तावित शिक्षेस अनुसरुन सहायक पोलीस उपनिरीक्षक/१३०६ यांनी २४/१०/२०२३ अन्वये त्यांचे अभिवेदन / खुलासा या कार्यालयास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी दोषारोपास अनुसरुन खालीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत. तसेच, सदर विभागीय चौकशीतील इतर सह अपचारी यांचे अंतिम आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहेत.

Scanned with ACE Scanner

दि. २३/०९/२०२१ रोजी माझी पो.नि. गोरखनाथ जाधव यांचे आदेशाने सकाळी ०९.०० वा. पासून ते २१.०० वाजेपर्यंत पोलीस स्टेशनला डयुटी ऑफिसर म्हणून डयुटी होती. मी सकाळी ०९.०० वा. माझे डयुटीवर हजर झालो. त्यावेळी सोबत रायटर म्हणून पो.कॉ. विष्णू चव्हाण ब.नं. १४५० हजर होता. ठाणेदार श्री. गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे व ब.नं. १६६० व सोबत चालक पो.कॉ. रामकृष्ण चांगोले ब.नं. १४३८ असे मोबाईल व्हॅनने पेट्रोलींगला बाहेर गेले होते. आम्ही दैनंदिन डयुटी करीत असतां १३.०० वा. दरम्यान शेख जावेद शेख वहिद रा. वलगांव याचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला आला. त्याचे वडीलांनी मारहाण केलेबाबत सांगितले. रिपोर्ट घेवुन मी त्याबाबत No/No ८३८/२०२१ क ३२३, ५०४ भादंविचा दाखल केल्याने मी माझा रायटर पो.कॉ. विष्णू चव्हाण यास जखमीस दवाखाण्यात घेवुन जाण्यास सांगितले. पो.कॉ. विष्णू चव्हाण हे फिर्यादीस PHC ग्रामीण रुग्णालयात घेवुन गेला. त्याला येण्यास उशिर झाल्याने, त्यावेळी फिर्यादी महिला सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे ही तिचे लहान मुलीला घेवुन, पो.स्टेशनला आली होती. ती महिला असल्याने तिचा रिपोर्ट घेण्याकरिता मी रिपोर्ट घेण्यास स्टेशन डायरी अंमलदार महिला ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० असे रिपोर्ट घेत असता, स्टेशन डायरी अंमलदार ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० हिला मी आदेश दिले की, तुम्ही पिडीत मुलगी सानिका चावरे यांना सोबत घेवुन, वायरलेस रुममध्ये बसवुन तिला विचारपुस करीत होती. फिर्यादी महिला सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे हिने रिपोर्टमध्ये सांगितले की, तिचे शेजारी राहणारा अरुण जवंजाळ नावाचा इसम हा दि. २२/०९/२०२१ रोजी घरी आला. मुलीला म्हणाला की, माझे घरी चल मुलीने त्यास आई घरी आहे येत नाही. आईने ऐकल्याने तिने मुलीला विचारले तेव्हा मुलीने तिचे आईजवळ सांगितले की, अरुण जवंजाळ घरी घेवुन जातो १० ते २० रुपयांचे आमिष देतो. कपडे काढतो व त्याचेही कपडे काढतो. त्याचे लघवीची जागा तिचे लघवीचे ठिकाणी लावतो. घटना गंभीर असल्याने घटनेची माहिती मी ठाणेदार पो.नि. गोरखनाथ जाधव साहेब यांना फोनव्दारे दिली. त्यांनी आरोपीचे नाव विचारल्याने मी त्यांना आरोपीचे नाव अरुण जवंजाळ रा. आष्टी असे सांगितले व मी फिर्यादीला विचारपुस केली तेव्हा तिने सांगितले की, गावात राहणारा अरुण जवंजाळ याने तिचे मुलीवर लैंगिक अत्याचार केलेला आहे. ही बाब गंभीर असल्याने पिडीतेची आई सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे हिने रिपोर्ट दिल्याने महिला ना.पो.कॉ. ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० हिने महिला म्हणून रिपोर्टवर सही केली आहे. त्यानंतर ठाणेदार श्री. गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे ब.नं. १६६० व सोबत चालक पो.कॉ. रामकृष्ण इंगोले ब.नं. १४३८ यांनी त्या आरोपी इसमास घेवुन, बाहेर गावावरुन केव्हा आणले, कोणत्या मार्गाने आणले व कोठे बसविले व कोणाचे ताब्यात दिले याबाबत मला माहिती नाही व मला सांगितले सुध्दा नाही. माझे किंवा माझे सोबतचे रायटर पो.कॉ. विष्णू चव्हाण ब.नं. १४५० आमचे ताब्यात सुध्दा दिले नाही. आम्ही पिडीत मुलीचे आईच्या समोरच व-हांडयात रिपोर्ट घेत होतो. मी साहेब बाहेरुन आल्यानंतर पिडीतेचा रिपोर्ट साहेबांचे चेंबरमध्ये दाखविण्यास गेलो. ना.पो.कॉ. ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० ही मुलीस सोबत घेवुन, पिडीतेचे बयान घेण्याकरिता वायरलेस वेगळया रुममध्येच होती पिडीतेला विचारपुस करीत होती. दुपारी ०३.३० वा पो.नि जाधव साहेब हे चेंबरमधून आले व त्यांनी आरोपी बसवुन ठेवलेल्या हॉलमध्ये गेले. त्यांचेसोबत त्यांचा वाहन चालक पो.कॉ. चांगोले ब.नं. १४३८ व रायटर पो.कॉ. सागर ब.नं. १६६० हे वायरलेस रुममध्ये गेले ते कर्मचा-यांसोबत बोलत होते तेव्हा ठाणेदार पो.नि. गोरखनाथ जाधव साहेबांचा ओरडण्याचा आवाज आला म्हणून मी व ना.पो.कॉ. ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० असे धावत पोलीस निरीक्षक साहेबांच्या मागे गेलो. तेव्हा पोलीस स्टेशन डायरी रुमचे मागचे वेगळया हॉलमध्ये एक इसम शर्टचे सहायाने पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. त्यावेळी त्या इसमाचे नाव रिपोर्टमधील अरुण जवंजाळ रा. आष्टी असल्याचे आम्हाला माहित पडलेनंतर पो.नि. जाधव साहेब यांनी वरिष्ठांना माहिती दिली. आम्हाला पो.नि. जाधव साहेब व त्यांचा रायटर सागर गोगटे यांनी आरोपी इसमास कोणाचेही ताब्यात दिले नाही. तसेच, आरोपीबाबत काहीच सांगितले नाही व त्यांनी गार्डसुध्दा नेमली नाही. आरोपी आणलेबाबत त्यांची जबाबदारी असतांना सुध्दा स्टेशन डायरीमध्ये त्यांनी कोणतीही नोंद सुध्दा घेतली नाही. पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांनी गुन्हा नोंद होण्याचे पुर्वीच आरोपीस पो.स्टे.ला आणल्याचे नंतर माहित पडले. नंतर मी माझी दैनंदिन डयुटी केली. मी डयुटीवर अत्यंत सतर्क राहून डयुटी करतो. आरोपी माझे ताब्यात दिलाच नसल्याने मी स्टेशन डायरीला नोंद घेतली नाही. पोलीस स्टेशनला घडलेल्या आरोपीने स्टेशन डायरी हॉलमध्ये नव्हे तर स्टेशन डायरी हॉलचे मागे बरेच लांब असलेल्या वेगळया हॉलमध्ये आरोपीने गळफास घेतलेला आहे. त्याने गळफास का व कोणत्या कारणावरुन घेतला हे मला माहित नाही. आरोपीचे मृत्यूनंतर साहेबांचे आदेशाने मी महिलेच्या फिर्यादवरुन लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंद केला. आरोपीने गळफास घेतल्याने मी डी.ओ. या नात्याने मी मृतक तर्फे फियादी होवुन रिपोर्ट दिला. माझे रिपोर्टवरुन कस्टडी मृत्यू क्र. ३५/२०२१ क. १७४ जा.फौ. प्रमाणे मर्ग दाखल केला. हॉलमध्ये आरोपीने गळफास घेतलेल्या घटनेशी माझा व रायटर पो.कॉ. विष्णू चव्हाण व ना.पो.कॉ. ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० यांचा कोणताही संबंध नाही. मी माझे कर्तव्य चोखपणे हाताळले आहे. मी माझे कर्तव्यात कोणताही हलगर्जीपणा, कसूर, चुक केलेली नाही. माझेविरुध्द कोणीही साक्ष पुरावा किंवा साधी तक्रार सुध्दा दिलेली नाही. तरी, सुध्दा झालेल्या घटनेत माझा कोणताही सहभाग नाही. तरी सुध्दा मला व माझे सोबतचे कर्मचारी यांना शहानिशा न करता चुकीचे पध्दतीने निलंबित करण्यात आले होते. ते न्याय झाले नाही. मला सजा झालेली आहे. गुन्हे अन्वेषण विभाग यांनी त्यांचेविरुध्द अप नं. १८/२०२२ क. ३०६, ३३०, ३४ भादंवि व ३ (२) (सात) अनु.जाती जमाती अन्वये गुन्हा नोंद करुन, तपासावर आहे. ही बाब विभागीय चौकशी अधिकारी यांनी चौकशी अधिकारी यांनी लपविले आहे. माझा घटनेशी संबंध

Scanned with ACE Scanner

यांनी मला निलंबित करुन, पगार कपात केला आहे. माझेवर लावलेले आरोप खरे नाहीत. गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती मी कोठडी मृत्यू घटनेचा तपास केला आहे. यातील खरे दोषी ठाणेदार श्री. गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. ...गार गोगटे ब.नं. १६६० व सोबत चालक पो.कॉ. रामकृष्ण चांगोले ब.नं. १४३८ यांचेविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. तपास सुरु आहे. मी दोषी नाही. मला ते मान्य नाही. माझे दिलेले व्यक्तिगत स्पष्टीकरण जबाब नियमांना धरुन संयुक्तिक व अगदी खरा आहे.

-: निष्कर्ष :-

१. एकंदरीत सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप यांनी त्यांच्या कर्तव्यात असतांना त्यांचेवर अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली होती. सदरहू चौकशी अहवालामध्ये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यात आले होत. सदर दोषारोपास अनुसरुन त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणांचे /अभिवेदनांचे अवलोकन केले असता, ते त्यांचे कर्तव्य योग्यरितीने बजावण्यात अयशस्वी ठरले असल्याचे आढळून आले आहे. तथापि, सपोउपनि/१३०६ मोहन सानप यांचा मागील सेवाभिलेख विचारात घेता व प्रकरणांची स्थिती पाहता त्यांना प्रस्तावित शिक्षेत बदल करणे न्यायोचित होईल. मी, **"सक्षम प्राधिकारी"** म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, मधील कलम २५ नुसार प्रदान असलेल्या अधिकारान्वये तसेच, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ नियम क्र.३ मधील तरतुदींनुसार पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

-: आदेश :-

मी, डॉ. निखिल गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई याव्दारे, सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप यांना उपरोक्त दोषारोपांच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या संदर्भाधीन दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"त्यांना त्यांचे सद्याच्या सपोउपनि पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षाकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** या शिक्षेऐवजी **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाचे कालावधीसाठी (अपरिणामकारक) रोखणे "**ही शिक्षा देत आहे.

२. सदर शिक्षेने अपचारी व्यथित होत असतील तर, हे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत ते या कार्यालयाच्या मार्फतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचेकडे अपील करु शकतात.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 03-09-2024 18:52:03

**(डॉ. निखिल गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप, नेमणूक पोलीस आयुक्त, अमरावती शहर
**(मार्फत :- पोलीस आयुक्त, अमरावती शहर)**

प्रत,
पोलीस आयुक्त, अमरावती शहर
२/- सदर डिजीटल स्वाक्षरी केलेल्या आदेशांची प्रत सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप यांना त्वरीत अदा करुन, दुय्यम प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकित स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी. **सदर आदेशानुसार सपोउपनि/१३०६ यांना अदा करण्यात आलेल्या आदेशाची दुय्यम प्रत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व सदर शिक्षेची अंमलबजावणी पूर्ण न झाल्यास त्यास संबंधित कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ३, व ९

Scanned with ACE Scanner

..10211/1/2023-DESK 11A

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : पोमसं/११/२२/६-कसुरी-पोनि-जाधव व इतर ३/७४/२०२४ दिनांक : ई-ऑफीस स्वाक्षरी

संदर्भ :- १. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक : विपोमनि(गुन्हे-पूर्व)/गुअवि/अमरावती/पोस्टे वलगाव/अमृनं/ ३५-२१/कसुरी/९३/२०२२, दि.०२/०२/२०२२ चे पत्र व सोबतचे सहपत्रे

२. सहायक पोलीस आयुक्त, गाडगेनगर विभाग, अमरावती तथा विभागीय चौकशी अधिकारी यांचे क्रमांक : २५१५/२०२३, दि.०५/०५/२०२३ चा समारोप अहवाल

३. या कार्यालयाचे क्रमांक : पोमसं/११-अ/२२/८/कसुरी-पोलीस कोठडी मृत्यू/५८/२०२२, दि.१४/०९/२०२३ ची कारणे दाखवा नोटीस

४. मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांचे दि.२४/१०/२०२३ चे अभिवेदन

विषय :- विभागीय चौकशीबाबत..

१. सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप

२. मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके

३. पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण

सर्व तत्का.नेम. वलगाव पोलीस स्टेशन, जि. अमरावती

*******

-: अंतिम आदेश :-

१) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) सपोउपनि/१३०६ मोहन भा. सानप ४) मपोना/१२० ज्योत्सना वा. सोळंके ५) पोहवा/१४५० विष्णू म. चव्हाण ६) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंबे ७) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे हे सर्व पोलीस स्टेशन वलगांव, जि. अमरावती येथे नेमणुकीस असतांना पोलीस स्टेशन अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी करण्यात आली होती. सदर विभागीय चौकशी अहवाल व खंड पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यालयाकडून दि.१५/०६/२०२३ अन्वये या कार्यालयास पाठविला आहे. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये १) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंब ४) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे यांचे प्रकरण बंद करण्यात आले आहे. उर्वरित कसुरदारांपैकी कसुरदार क्र.४ **मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके** यांचेवर खालीलप्रमाणे खालीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.

दि.२३/०९/२०२१ चे ९.०० वा. ते २१.०० वा. पावेतो डयुटी ऑफीसर डयुटी असतांना त्यांनी खालीलप्रमाणे कसुरी केली :-

१. तक्रार पो.स्टे. ला आल्याबाबत व पो.नि. यांनी तक्रार व आरोपीबाबत माहिती दिल्याचे स्टे.डा. ला नोंद घेतली नाही.
२. स्टे. डा. ला डयुटी असतांना इतरत्र जाऊन बसले.
३. आरोपी ताब्यात घेतलेबाबत स्टे.डा. नोंद घेतली नाही.
४. आरोपीला स्टे.डा. रुमच्या मागील हॉलमध्ये बसविले असतांना त्यांचेवर लक्ष न देता इतरत्र जाऊन बसले.
५. पो.स्टे. ला चालू असलेल्या घटना क्रमाच्या नोंदी स्टे.डा. ला वेळोवेळी घेतल्या नाहीत.

त्यामुळे मयत आरोपी यास पंख्याला गळफास घेण्यास संधी मिळाली. म्हणून सदर पोहवा यांनी आपले कर्तव्य बजावित असतांना हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला.

Scanned with ACE Scanner

२. सदर दोषारोपाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांना **"त्यांना त्यांचे सद्याच्या पोना पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षांकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** हि शिक्षा प्रस्तावित केली होती. सदरची कारणे दाखवा नोटीस त्यांना प्राप्त झाली असून, प्रस्तावित शिक्षेस अनुसरुन मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांनी २४/१०/२०२३ अन्वये त्यांचे अभिवेदन / खुलासा या कार्यालयास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी दोषारोपास अनुसरुन खालीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत. तसेच, सदर विभागीय चौकशीतील इतर सह अपचारी यांचे अंतिम आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहेत.

दि. २३/०९/२०२१ रोजी माझी पो.नि. साहेब वलगांव यांचे आदेशाने डयुटी मदतगार यांनी दुपारी १४.०० वा पासून ते २१.०० वाजेपर्यंत पोलीस स्टेशनला स्टाफ कमी असल्याचे कारणावरुन स्टेशन डायरी व सि.सि.टी.एन.एस नोंदी अशा एकाच वेळी दोन डयुटी लावण्यात आली होती. मी दुपारी १४.०० वा. माझे डयुटीवर हजर झाली. डयुटीचा चार्ज पो.कॉ. सतिश भुरे ब.नं. १८१८ यांचे कडून घेतला. त्यावेळी डी.ओ. ऑफिसर म्हणून ASI मोहन सानप ब.नं. १३०६ व त्यांचा रायटर पो.कॉ. विष्णू चव्हाण ब.नं. ३५२ हे हजर होते. दुपारचे वेळी फियादी महिला सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे ही तिचे लहान मुलीला घेवुन, पोलीस स्टेशनला आली होती. महिला असल्याने तिचा रिपोर्ट घेण्याकरिता D.O.ASI मोहन सानप यांनी मला रिपोर्ट घेण्यास D.O. चे टेबलजवळ बोलाविले व मला आदेश दिले की, तुम्ही पिडीत मुलगी हिला सर्व सामान्यांसमोर विचारपुस करता येत नसल्याने, त्यांना सोबत घेवुन, वायरलेस वेगळया रुममध्ये बसवुन सविस्तर विचारपुस करीत होतो. त्यावेळी वायरलेस डयुटीवर महिला पो.कॉ. कविता देशमुख ब.नं. ६२२ हजर होती. मी पिडीतेला विचारपुस केली तेव्हा तिने सांगितले की, गावात राहणारा अरुण जवंजाळ याने तिचेवर लैंगिक अत्याचार केलेला आहे असे सविस्तर सांगितले. ही बाब मी D.O.ASI मोहन सानप यांना सांगितली. त्यानंतर माझे समक्ष पिडीतेची आई सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे हिने D.O.ASI मोहन सानप यांचेसमोर रिपोर्ट दिल्याने मी महिला म्हणून रिपोर्टवर सही केली आहे. त्यावेळी पो.नि. साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे हे पोलीस स्टेशनला आलेले नव्हते. D.O.ASI मोहन सानप यांनी लैंगिक अत्याचाराबाबत पोलीस स्टेशनला रिपोर्ट आल्याबाबत फोनव्दारे ठाणेदार पो.नि. गोरखनाथ जाधव साहेब यांना माहिती दिली. मी पिडीतेची सुरक्षा व विचारपुस करीत वायरलेस रुममध्ये होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक व त्यांचा रायटर व वाहनचालक यांनी आरोपी इसमास माझे माघारी केव्हा आणले, कोणत्या मार्गाने आणले व कोठे व कोणत्या रुममध्ये बसविले व कोणाचे ताब्यात दिले याबाबत मला माहिती दिली नाही व सांगितले सुध्दा नाही. मी पिडीत मुलीस सोबत घेवुन, वायरलेस रुममध्ये पिडीतेस विचारपुस करीत होती. मी दुपारी ०३.३० वा. पोलीस निरीक्षक जाधव साहेब त्यांचे सोबत चालक पो.कॉ. रामकृष्ण चांगोले ब.नं. १४३८ व रायटर पो.कॉ. सागर गोगटे ब.नं. १६६० हे वायरलेस रुममध्ये आले. त्यांचेसोबत बोलत असता ठाणेदार पो.नि. गोरखनाथ जाधव साहेबांच्या ओरडण्याचा आवाज आला म्हणून मी व D.O.ASI मोहन सानप रायटर पो.कॉ. विष्णू चव्हाण असे धावत पोलीस निरीक्षक साहेबांचे मागे गेलो तेव्हा एक इसम वेगळया रुममध्ये पंख्याचे सहायाने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. त्यावेळी त्या इसमाचे नाव अरुण जवंजाळ रा. आष्टी असल्याचे आम्हाला नंतर माहीत पडले. आम्हाला या आधी पो.नि. व डी.ओ. यांनी त्यांनी सांगितल्या शिवाय कोणत्याही प्रकारच्या नोंदी स्टेशन डायरीमध्ये घेवु नये अशा तोंडी सूचना पुर्वी दिल्या आहेत. मला आरोपीबाबत काहीच सांगितले नसल्याने आरोपी इसमास माझे ताब्यात दिले नसल्याने, मी कोणतीही नोंद स्टेशन डायरीला घेतली नाही. पोलीस निरीक्षक साहेब व त्यांचा रायटर पो.कॉ. सोगर गोगटे ब.न. १६६० हे गुन्हा नोंद होण्याचे पुर्वीच आरोपीस पोलीस स्टेशनला आणतील हे अपेक्षित नव्हते. तसेच, त्यांनी आरोपीस आणल्यावर D.O.ASI मोहन सानप व रायटर विष्णू चव्हाण यांचे ताब्यात सुध्दा दिले नाही. मला सुध्दा सांगितले नाही. त्या आणलेल्या आरोपीवर गार्डसुध्दा नेमली नाही. नंतर मी माझी दैनंदिन डयुटी केली. मी डयुटीवर अंत्यंत सतर्क राहून डयुटी केली. मी पिडीतेचे बयान घेण्याकरिता वायरलेस वगेळया रुममध्ये होती. इतरत्र कोठेही बसली नाही. फिरली सुध्दा नाही. आरोपी माझे ताब्यात दिलाच नसल्याने व पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांनी आरोपीबाबत काहीच सांगितले नसल्याने मी स्टेशन डायरीला नोंद घेतली नाही. पोलीस स्टेशनला घडलेल्या इतर नोंदी मात्र वेळोवेळी घेतली आहे. साहेबांनी आणलेल्या आरोपीने स्टेशन डायरी हॉलमध्ये नव्हे तर स्टेशन डायरी हॉलच्या मागे बरेच लांब असलेल्या मागचे हॉलमध्ये गळफास घेतलेला आहे. त्याने गळफास का व कोणत्या कारणावरुन घेतला हे मला माहित नाही. हॉलमध्ये गळफास घेतलेल्या घटनेशी माझा कोणताही संबंध नाही. माझा आरोपी मृत्यूचे घटनेत सहभाग नाही. माझ्यावर लावलेलेस्टेशन डायरी नोंद व निष्काळजीपणाचे आरोप नियमाला धरुन नाहीत. मी माझे कर्तव्यात कोणताही हलगर्जीपणा कसूर केलेला नाही. माझेवर लावलेले आरोप खरे नसून, नियमाला धरुन नाही. माझेविरुध्द कोणीही तसा साक्ष पुरावा, तक्रार सुध्दा दिली नाही. माझा मृत्यू घटनेशी कोणताही सबंध सहभाग नसतांना सुध्दा चुकीचे पध्दतीने निलंबित करण्यात आले होते. गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांनी कोठडी मृत्यू घटनेचा तपास केला आहे. यातील खरे दोषी ठाणेदार श्री. गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे ब.नं. १६६० व सोबत चालम पो.कॉ. रामकृष्ण चांगोले ब.नं. १४३८ यांचेविरुध्द चौकशीअंती अपराध क्र. १८/२०२२ कलम ३०६, ३३०, ३४ भादंविप्रमाणे गुन्हा नोंद असून, गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडे तपासावर आहे. घटनेमध्ये माझेविरुध्द कोणताही सबळ साक्ष पुरावा मिळून आला नाही. विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांनी आमचे अंतिम जबाबाचा विचार न करता जे घटनेला खरे जबाबदार असलेले ठाणेदार पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव + २

Scanned with ACE Scanner

यांचाविरुध्द दाखिल असलेला गुन्हा लपविलेला आहे. माझे घटनेत सहभाग नसतांना निलंबित करण्यात आले होते. माझा पगार कपात करण्यात आला आहे. सदरहू प्रकरणात मला शिक्षा झाली आहे. आता पुन्हा ०३ वर्षांकरिता मुळ वेतनावर ठेवणे निश्चितच न्याय होणार नाही. ते रद्द करण्यात यावे. मी दिलेले स्पष्टीकरण जबाब नियमांना धरुन संयुक्तिक व अगदी खरा आहे करिता सविनय सादर आहे.

**-: निष्कर्ष :-**

३. एकंदरीत मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांनी त्यांच्या कर्तव्यात असतांना त्यांचेवर अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली होती. सदरहू चौकशी अहवालामध्ये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यात आले होत. सदर दोषारोपास अनुसरुन त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणांचे /अभिवेदनांचे अवलोकन केले असता, ते त्यांचे कर्तव्य योग्यरितीने बजावण्यात अयशस्वी ठरले असल्याचे आढळून आले आहे. तथापि, मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांचा मागील सेवाभिलेख विचारात घेता व प्रकरणांची स्थिती पाहता त्यांना प्रस्तावित शिक्षेत बदल करणे न्यायोचित होईल. मी, **"सक्षम प्राधिकारी"** म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, मधील कलम २५ नुसार प्रदान असलेल्या अधिकारान्वये तसेच, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ नियम क्र.३ मधील तरतुदींनुसार पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**-: आदेश :-**

मी, डॉ. निखिल गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई याव्दारे, मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांना उपरोक्त दोषारोपांच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या संदर्भाधीन दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"त्यांना त्यांचे सद्याच्या पोना पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षांकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** या शिक्षेऐवजी **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाचे कालावधीसाठी (अपरिणामकारक) रोखणे** "ही शिक्षा देत आहे.

२. सदर शिक्षेने अपचारी व्यथित होत असतील तर, हे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत ते या कार्यालयाच्या मार्फतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचेकडे अपील करु शकतात.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 04-09-2024 10:47:35

(डॉ. निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके, नेमणूक पोलीस आयुक्त, अमरावती शहर
**(मार्फत :- पोलीस आयुक्त, अमरावती शहर)**

**प्रत,**
**पोलीस आयुक्त, अमरावती शहर**

२/- सदर डिजीटल स्वाक्षरी केलेल्या आदेशांची प्रत मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांना त्वरीत अदा करुन, दुय्यम प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकित स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी. **सदर आदेशानुसार मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके यांना अदा करण्यात आलेल्या आदेशाची दुय्यम प्रत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व सदर शिक्षेची अंमलबजावणी पूर्ण न झाल्यास त्यास संबंधित कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ३, ९ व १२

Scanned with ACE Scanner

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : पोमसं/११/२२/६-कसुरी-पोनि-जाधव व इतर ३/७४/२०२४ दिनांक : ई-ऑफीस स्वाक्षरी

संदर्भ :- १. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक : विपोमनि(गुन्हे-पूर्व)/गुअवि/अमरावती/पोस्टे वलगाव/अमृनं/ ३५-२१/कसुरी/१३/२०२२, दि.०२/०२/२०२२ चे पत्र व सोबतचे सहपत्रे

२. सहायक पोलीस आयुक्त, गाडगेनगर विभाग, अमरावती तथा विभागीय चौकशी अधिकारी यांचे क्रमांक : २५१५/२०२३, दि.०५/०५/२०२३ चा समारोप अहवाल

३. या कार्यालयाचे क्रमांक : पोमसं/११-अ/२२/८/कसुरी-पोलीस कोठडी मृत्यू/५८/२०२२, दि.१४/०९/२०२३ ची कारणे दाखवा नोटीस

४. पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांचे दि.२७/१०/२०२३ चे अभिवेदन

विषय :- **विभागीय चौकशीबाबत..**

१. सपोउपनि/१३०६ मोहन भास्करराव सानप

२. मपोना/१२० ज्योत्सना वामनराव सोळंके

३. पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण

सर्व तत्का.नेम. वलगाव पोलीस स्टेशन, जि. अमरावती

*******

-: अंतिम आदेश :-

१) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) सपोउपनि/१३०६ मोहन भा. सानप ४) मपोना/१२० ज्योत्सना वा. सोळंके ५) पोहवा/१४५० विष्णू म. चव्हाण ६) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंबे ७) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे हे सर्व पोलीस स्टेशन वलगांव, जि. अमरावती येथे नेमणुकीस असतांना पोलीस स्टेशन अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी करण्यात आली होती. सदर विभागीय चौकशी अहवाल व खंड पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यालयाकडून दि.१५/०६/२०२३ अन्वये या कार्यालयास पाठविला आहे. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये १) पोउपनि सत्यवान रा. भुयारकर २) पोउपनि आशिष अ. देशमुख ३) पोहवा/१००४ मारोती श्या. कळंब ४) पोना/१२५५ नरेंद्र उ. उघडे यांचे प्रकरण बंद करण्यात आले आहे. उर्वरित कसुरदारांपैकी कसुरदार क्र. ५ **पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण** यांचेवर खालीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत :-

दि.२३/०९/२०२१ चे ९.०० वा. ते २१.०० वा. पावेतो डयुटी ऑफीसर डयुटी असतांना त्यांनी खालीलप्रमाणे कसुरी केली :-

१. आरोपीला स्टे.डा. च्या मागील रुममध्ये एकटे बसवून स्वत: बाहेर व्हरांडयात येवून बसले.

२. आरोपीवर योग्य ती निगराणी ठेवली नाही..

त्यामुळे मयत आरोपी यास पंख्याला गळफास घेण्यास संधी मिळाली. म्हणून सदर कर्मचारी यांनी आपले कर्तव्य बजावित असतांना हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला.

२. सदर दोषारोपाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांना **"त्यांना त्यांचे सद्याच्या पोहवा पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षाकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** हि शिक्षा प्रस्तावित केली होती. सदरची कारणे दाखवा नोटीस त्यांना प्राप्त झाली असून, प्रस्तावित शिक्षेस अनुसरुन पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांनी २७/१०/२०२३ अन्वये त्यांचे अभिवेदन / खुलासा या कार्यालयास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी दोषारोपास अनुसरुन खालीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत. तसेच, सदर विभागीय चौकशीतील इतर सह अपचारी यांचे अंतिम आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहेत.

Scanned with ACE Scanner

दि.२३/०९/२०२१ रोजी माझी पोलीस निरीक्षक साहेब यांचे आदेशाने सकाळी ०९.०० वा. पासून ते २१ वाजेपर्यंत पोलीस स्टेशनला D.O.ASI मोहन सानप यांचे सोबत रायटर म्हणून डयुटी लावली होती. मी सकाळी ०९.०० वा. डयुटीवर हजर झालो. त्यावेळी डी.ओ. ऑफिसर म्हणून ASI मोहन सानप ब.नं. १२०६ व त्यांचा रायटर म्हणून मी हजर होतो. टाणेदार श्री गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे ब.नं. १६६० व त्यांचेसोबत चालक पो.कॉ. चांगोले ब.नं. १४३८ असे मोबाईल वाहनाने पेट्रोलींगला गेले होते. आम्ही दैनंदिन डयुटी करीत असता १३.०० वा. दरम्यान शेख जावेद शेख वहिद रा. वलगांव यांचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला आला. त्यास त्याचे वडिलांनी मारहाण केलेबाबत सांगितले. रिपोर्ट घेवुन D.O.ASI मोहन सानप यांचे आदेशाने NC/No ८३८/२०२१ क ३२३, ५०४ भादंविचा दाखल केल्याने मला जखमीस दवाखाण्यात उपचाराकरिता घेवुन जाण्यास सांगितले. मी स्टेशन डायरीमध्ये नोंद घेवुन, १३.०० वा. त्यास PHC दवाखाण्यात घेवुन गेलो. त्या जखमीने डॉक्टरांशी वाद केल्याने मला येण्यास उशिर झाला. त्यावेळी फिर्यादी महिला सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे ही तिचे मुलीला घेवुन, पोलीस स्टेशनला आली होती. तिचा रिपोर्ट घेण्याकरिता D.O.ASI मोहन सानप यांनी मला फोनवरुन बोलाविले. मी बरेच उशिराने ठाण्यात पोहोचलो. स्टेशन डायरी अंमलदार ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० ही पिडीत मुलगी यांना सोबत घेवुन, वायरलेस वेगळया रुममध्ये बसवुन सविस्तर विचारपुस करीत होती. त्याप्रमाणे LPC ज्योत्स्ना सोळंके ही पिडीत मुलगी कु. सानिका चावरे हिला सोबत घेवुन वायरलेस रुममध्ये बसवुन तिला विचारपुस करीत होती. D.O.ASI मोहन सानप यांनी फिर्यादीला विचारपुस केली तेव्हा तिने DO सांगितले की, गावात राहणारा अरुण जवंजाळ याने तिचे मुलीवर लैंगीक अत्याचार केलेला आहे असे D.O.ASI मोहन सानप यांचे सांगितले. पिडीतेची आई सौ. शोभा श्रीकृष्ण चावरे हिने रिपोर्ट दिल्याने स्टेशन डायरी अंमलदार ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० हिने रिपोर्ट घेतल्याचे माहिती पडले. पो.नि. गोरखनाथ जाधव साहेब व त्यांचे रायटर पो.कॉ. सागर गोगटे हे पोलीस स्टेशनला नव्हते. D.O.ASI मोहन सानप यांनी लैंगीक अत्याचारबाबत पोलीस स्टेशनला रिपोर्ट आल्याबाबत फोनव्दारे पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांना माहिती दिल्याचे माहित पडले. त्यानंतर पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव व त्यांचा रायटर सागर गोगटे ब.नं. १६६० सोबत चालक पो.कॉ. चांगोले ब.नं. १४३८ यांनी आरोपीस घेवुन केव्हा आणले, कोणत्या मार्गाने आणले व कोठे व कोणत्या रुममध्ये बसविले व कोणाचे ताब्यात दिले याबाबत मला काहीच माहिती नव्हती. त्यांनी आरोपीस आणलेबाबत स्टेशन डायरीला नोंद घेणे व त्याचेवर गार्ड नेमणे अपेक्षित होते. तसेच त्यांनी केले नाही व आपली जबाबदारी झटकली. त्यांनी सांगितले सुध्दा नाही. फक्त साहेब पोलीस स्टेशनला आले एवढेच माहित पडले. त्यावेळी मी पोलीस स्टेशनला हजर नव्हतो. पिडीत मुलीचे D.O.ASI मोहन सानप हे साहेबांचे चेंबरमध्ये रिपोर्ट दाखविण्यास गेले. LNPC ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० ही मुलीस सोबत घेवुन पिडीतेचे बयान घेण्याकरिता वायरलेस वेगळया रुममध्ये होती. ती पिडीतेला विचारपुस करीत होती. नंतर D.O.ASI मोहन सानप यांनी लैंगीक अत्याचाराचा गुन्हा नोंद केला. दुपारी ०३.३० वा. पोलीस निरीक्षक जाधव साहेब हे चेंबरमधून बाहेर आले व त्यांनी आरोपी ठेवलेल्या होलमध्ये गेले. त्यांचेसोबत त्यांचा रायटर सागर गोगटे ब.नं. १६६० सोबत चालक पो.कॉ. चांगोले ब.नं. १४३८ हे वायरलेस रुममध्ये आले. त्यांचेसोबत बोलत असता जाधव साहेबांचा ओरडण्याचा आवाज आला म्हणून मी व D.O.ASI मोहन सानप व LNPC ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० असे धावत पोलीस निरीक्षक साहेबांचे मागेच नंतर गेलो. तेव्हा पोलीस स्टेशनचे स्टेशन डायरीचे मागचे हॉलमध्ये दुर अंतरावर एक इसम शंचे सहायाने पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. त्यावेळी त्या इसमाचे नाव रिपोर्टमधील अरुण जवंजाळ रा. आष्टी असल्याचे माहीत पडलेनंतर पोलीस निरीक्षक साहेब यांनी वरिष्ठांना माहिती दिली. आम्हाला पोलीस निरीक्षक जाधव साहेब व त्यांचा रायटर सागर गोगटक यांनी आरोपीस आणलेबाबत काहीच सांगितले नाही व माझे किंवा D.O.ASI मोहन सानप यांचे ताब्यात सुध्दा दिले नाही व त्यांनी गार्ड सुध्दा नेमली नाही. आरोपी इसमास कोणाचेही ताब्यात दिले नाही. व स्टेशन डायरीमध्ये नोंद सुध्दा घेतली नाही. आरोपी इसमास कोणचेही ताब्यात दिलेच नसल्याने त्यामुळे D.O.ASI मोहन सानप व स्टेशन डायरी अंमलदार ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० यांनी कोणतीही नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली नाही. पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांनी महिला अत्याचाराचा गुन्हा नोंद होण्याचे पुर्वीच आरोपीस पोलीस स्टेशनला आणल्याचे माहित पडले. नंतर मी माझी दैनंदिन डयुटी केली. मी डयुटीवर अत्यंत सतर्क राहून डयुटी करतो. LNPC ज्योत्स्ना सोळंके ब.नं. १२० ही पिडीतेचे बयान घेण्याकरिता वायरलेस रुममध्ये होती. आरोपी माझे ताब्यात दिलाच नाही. पोलीस स्टेशनला घडलेल्या आरोपीचा मृत्यू स्टेशन डायरी हॉलमध्ये नव्हे तर स्टेशन डायरी हॉलचे मागे बरेच लांब असलेल्या हॉलमध्ये गळफास घेतलेला आहे. त्याने गळफास का व कोणत्या कारणावरुन घेतला हे मला माहित नाही. त्यानंतर D.O.ASI मोहन सानप यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवुन आरोपीचे मृत्यू प्रकरणी रिपोर्ट दिला. त्यांचे रिपोर्टवरुन मर्ग क्र. ३५/२०२१ क. १७४ जा.फौ. प्रमाणे मर्ग दाखल झाला आहे. आरोपीने मागचे हॉलमध्ये गळफास घेतलेल्या घटनेशी माझा कोणताही संबंध नाही. घटनेच्यावेळी मी ठाण्यात हजर नव्हतो. माझी फिर्यादीस दवाखाण्या घेवुन जाण्याची स्टेशन डायरीमध्ये रवानगी नोंद आहे. सदर मृत्यूबाबत गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांनी वेगळा व खरा तपास करुन आरोपीचे मृत्यूला खरे जबाबदार असणारे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव व त्यांचा रायटर सागर गोगटे ब.नं. १६६० सोबत चालक पो.कॉ. चांगोले ब.नं. १४३८ हे जबाबदार असल्याने त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन वलगांव येथे अपराध क्र. १८/२०२२ क. ३०६, ३३०, ३४ भादंवि व ३ (२) (सात) अनुसूचीत जातीजमाती कायदा अन्वये गुन्हा नोंद असून, सदर मृत्यूबाबत गुन्हे अन्वेषण विभाग यांचे तपासावर आहे. सदरहू

Scanned with ACE Scanner

प्रकरणं मध्ये माझी सहभाग नसताना सुध्दा हलगर्जीपणा कसूर केल्याबाबत विनाकारण ठपका ठेवत आहे हे खरे नाही ते विभागीय चौकशीत सिध्द झालेले नाही. मी माझे कर्तव्यात कोणताही हलगर्जीपणा कसूर, चुक केलेली नाही. माझेवर लावलेले आरोप व:स्तुस्थितीला व नियमांना धरुन नाहीत. सदर घटनेत माझा सहभाग सुध्दा नाही. मला निलंबित करुन माझा पगार कपात झाला आहे. मला सजा झाली आहे. मला त्यामुळे आम्हास मुळ वेतनावर ०३ वर्षाकरिता ठेवणे न्याय होणार नाही. तसेच, माझेविरुध्द कोणी साक्ष पुरावा, तक्रार सुध्दा दिलेला नाही. माझेवर लावलेले आरोप खरे नाहीत. त्यामुळे प्रस्तावित शिक्षा रद्द करण्यात यावी. म्हणून मी ते मान्य केले नाही. माझा दिलेला कारणे दाखवा नोटीसला स्पष्टीकरण जबाब नियमांना धरुन संयुक्तिक व खरा आहे. करिता माझा कारणे दाखवा स्पष्टीकरण जबाबात सविनय सादर आहे.

-: निष्कर्ष :-

३. एकंदरीत पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांनी त्यांच्या कर्तव्यात असतांना त्यांचेवर अ.मृ.क्र. ३५/२०२१ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये दाखल पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली होती. सदरहू चौकशी अहवालामध्ये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यात आले होत. सदर दोषारोपास अनुसरुन त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणांचे /अभिवेदनांचे अवलोकन केले असता, ते त्यांचे कर्तव्य योग्यरितीने बजावण्यात अयशस्वी ठरले असल्याचे आढळून आले आहे. तथापि, पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांचा मागील सेवाभिलेख विचारात घेता व प्रकरणांची स्थिती पाहता त्यांना प्रस्तावित शिक्षेत बदल करणे न्यायोचित होईल. मी, **"सक्षम प्राधिकारी"** म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, मधील कलम २५ नुसार प्रदान असलेल्या अधिकारान्वये तसेच, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ नियम क्र.३ मधील तरतुदींनुसार पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

-: आदेश :-

मी, डॉ. निखिल गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई याव्दारे, पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांना उपरोक्त दोषारोपांच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या संदर्भाधीन दि.१४/०९/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"त्यांना त्यांचे सद्याच्या पोहवा पदाच्या मुळ वेतनावर ०३ वर्षाकरिता (परिणामकारक) का ठेवण्यात येऊ नये?"** या शिक्षेऐवजी **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाचे कालावधीसाठी (अपरिणामकारक) रोखणे "**ही शिक्षा देत आहे.

२. सदर शिक्षेने अपचारी व्यथित होत असतील तर, हे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत ते या कार्यालयाच्या मार्फतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचेकडे अपील करु शकतात.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 04-09-2024 10:47:12

(डॉ. निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
पोहवा/१४५० विष्णू मधुकर चव्हाण, नेमणूक पोलीस आयुक्त, अमरावती शहर
**(मार्फत :- पोलीस आयुक्त, अमरावती शहर)**

प्रत,
**पोलीस आयुक्त, अमरावती शहर**
२/- सदर डिजीटल स्वाक्षरी केलेल्या आदेशांची प्रत पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांना त्वरीत अदा करुन, दुय्यम प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकित स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी. **सदर आदेशानुसार पोशि/१४५० विष्णू मधुकर चव्हाण यांना अदा करण्यात आलेल्या आदेशाची दुय्यम प्रत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व सदर शिक्षेची अंमलबजावणी पूर्ण न झाल्यास त्यास संबंधित कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ३, ९ व १२

Scanned with ACE Scanner

# बक्षिस

**१.पोआअ/आस्था-८/ बक्षीस / १८७७/२०२५ अमरावती शहर दिनांक २०/०२/२०२५**

## आदेश

शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे .

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| १. | पोहवा/८९६ सुभाष मिश्रा | राजापेठ | दि.०९/०४/२०२४ रोजी गुडी पाडवा (मराठी नववर्ष) बंदोबस्त दरम्यान राजापेठ विभागात कायदा व सुव्यसस्था अबाधित राहण्या बाबत योग्य उपाय योजना केल्या व कोणताही अनुचित प्रकार घडु दिला नाही बाबत. | ३०० | जिएसटि |
| २. | पोहवा/९८५ राजु ठाकुर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ३. | पोहवा/१२०३ नंदकिशोर अंबुलकर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ४. | पोहवा/१३१३ धिरज बोपचे | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ५. | पोशि/८९ गणेश ददगाळ | पो.मुख्या. | | ३०० | जिएसटि |
| ६. | पोहवा/४९९ रियाज खान | मोपवि | | ३०० | जिएसटि |
| ७. | पोशि/१८०१ पुनित मेश्राम | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| ८. | पोशि/१४७३ प्रिती गाडवे | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| ९. | पोशि/१४३३ प्रविन सुर्यवंशी | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| १०. | पोहवा/८९६ सुभाष मिश्रा | राजापेठ | दि.२३/०५/२०२४ रोजी पार पाडलेल्या बौध्द पौर्णिमा निमित्य बंदोबस्त दरम्यान राजापेठ विभागात कायदा व सुव्यसस्था अबाधित राहण्या बाबत योग्य उपाय योजना केल्या व कोणताही अनुचित प्रकार घडु दिला नाही बाबत. | ३०० | जिएसटि |
| ११. | पोहवा/९८५ राजु ठाकुर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| १२. | पोहवा/१२०३ नंदकिशोर अंबुलकर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| १३. | पोहवा/१३१३ धिरज बोपचे | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| १४. | पोशि/८९ गणेश ददगाळ | पो.मुख्या. | | ३०० | जिएसटि |
| १५. | पोहवा/४९९ रियाज खान | मोपवि | | ३०० | जिएसटि |
| १६. | पोशि/१८०१ पुनित मेश्राम | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| १७. | पोशि/१४७३ प्रिती गाडवे | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| १८. | पोहवा/८९६ सुभाष मिश्रा | राजापेठ | दि.२४/०३/२०२४ रोजी पार पाडलेल्या होळी व धुलिवंदन निमित्य बंदोबस्त दरम्यान राजापेठ विभागात कायदा व सुव्यसस्था अबाधित राहण्या बाबत योग्य उपाय योजना केल्या व कोणताही अनुचित प्रकार घडु दिला नाही बाबत. | ३०० | जिएसटि |
| १९. | पोहवा/९८५ राजु ठाकुर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| २०. | पोहवा/१२०३ नंदकिशोर अंबुलकर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| २१. | पोहवा/१३१३ धिरज बोपचे | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| २२. | पोशि/८९ गणेश ददगाळ | पो.मुख्या. | | ३०० | जिएसटि |
| २३. | पोशि/३४४ प्रकाश किल्लेकर | मोपवि | | ३०० | जिएसटि |
| २४. | पोशि/५६० जयसिंगपुरे | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| २५. | पोशि/१४७३ प्रिती गाडवे | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| २६. | क.तज्ञ/सपोनि श्री.एम.पी.इंगोले | अंगुली मुद्रा कक्ष | अप.क्र. ५२२/२०२२ क.४५४,४५७,३८० भा.द.वि.गुन्हा मध्ये अंगुली मुद्रा तज्ञ यांना पाचारण केले असता आरोपी विरुध्द भौतीक पुरावा गोळा करुन आरोपी निष्पण करण्या मदत | २००० | सीनोट |
| २७. | सहा.छायाचित्रकार श्री.यु.डी.बानुबाकोडे | अंगुली मुद्रा कक्ष | | १५०० | सीनोट |
| २८. | पोशि/१५२ गोविंद धनवे | गुन्हे शाखा | | १००० | जिएसटि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | झाली. | | |
| २९. | क.तज्ञ/सपोनि श्री.एम.पी.इंगोले | अंगुली मुद्रा कक्ष | अप.क्र. ८८६/२०२३ क.४५४,३८० भा.द.वि.गुन्हा मध्ये अंगुली मुद्रा तज्ञ यांना पाचारण केले असता आरोपी विरुध्द भौतीक पुरावा गोळा करुन आरोपी निष्पण करण्या मदत झाली. | २५०० | सीनोट |
| ३०. | क.तज्ञ/सपोनि श्रीमती आर.ए.शेख | अंगुली मुद्रा कक्ष | | २००० | सीनोट |
| ३१. | सहा.छायाचित्रकार श्री.यु.डी.बानुबाकोडे | अंगुली मुद्रा कक्ष | | १५०० | सीनोट |
| ३२. | पोशि/१५२ गोविंद धनवे | गुन्हे शाखा | | १००० | जिएसटि |
| **एकुण** | | **एकोनवीस हजार रुपये फक्त** | | **१९,०००/-** | **--** |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.

**२.पोआअ/आस्था-८/ बक्षीस /१८७४/२०२५ अमरावती शहर दिनांक २०/०२/२०२५**

# आदेश

शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे .

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| १. | पोहवा/८९६ सुभाष मिश्रा | राजापेठ | दि.१७/०६/२०२४ रोजी बकरी ईद बंदोबस्त दरम्यान राजापेठ विभागात कायदा व सुव्यसस्था अबाधित राहण्या बाबत योग्य उपाय योजना केल्या बाबत. | ३०० | जिएसटि |
| २. | पोहवा/९८५ राजु ठाकुर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ३. | पोहवा/१२०३ नंदकिशोर अंबुलकर | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ४. | पोहवा/१३१३ धिरज बोपचे | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ५. | पोशि/८९ गणेश ददगाळ | पो.मुख्या. | | ३०० | जिएसटि |
| ६. | पोशि/३४४ प्रकाश किल्लेकर | मोपवि | | ३०० | जिएसटि |
| ७. | पोशि/१८०१ पुनित मेश्राम | राजापेठ | | ३०० | जिएसटि |
| ८. | पोशि/१४७३ प्रिती गाडवे | खोलापुरीगेट | | ३०० | जिएसटि |
| ९. | पोहवा/८९६ सुभाष मिश्रा | राजापेठ | लोकसभा निवडणुक २०२४ निमित्य दि.१६/०३/२०२४ ते दि.०६/०६/२०२४ आचार संहिता सुरु असताना कोणताही अनुचित प्रकार न घडु देता सुरळीत शांततेत पार पाडण्यास उल्लेखनिय कामगिरी केली. | २०० | जिएसटि |
| १०. | पोहवा/९८५ राजु ठाकुर | राजापेठ | | २०० | जिएसटि |
| ११. | पोहवा/१२०३ नंदकिशोर अंबुलकर | राजापेठ | | २०० | जिएसटि |
| १२. | पोहवा/१३१३ धिरज बोपचे | राजापेठ | | २०० | जिएसटि |
| १३. | पोशि/८९ गणेश ददगाळ | पो.मुख्या. | | २०० | जिएसटि |
| १४. | पोहवा/४९९ रियाज खान | मोपवि | | २०० | जिएसटि |
| १५. | पोशि/१८०१ पुनित मेश्राम | राजापेठ | | २०० | जिएसटि |
| १६. | पोशि/१४७३ प्रिती गाडवे | खोलापुरीगेट | | २०० | जिएसटि |
| १७. | क.तज्ञ/सपोनि श्री.एम.पी.इंगोले | अंगुली मुद्रा कक्ष | पो.स्टे.राजपोठ अप.क्र. ५८६/२०२४ क.३३१(४), ३०५(अ) भा.न्या.स.गुन्हा मध्ये अंगुली मुद्रा तज्ञ यांना | १००० | सीनोट |
| १८. | पोहवा/१०५२ सुधीर गुडधे | गुन्हे शाखा | | १००० | जिएसटि |
| १९. | पोशि/१५२ गोंविद धनवे | गुन्हे शाखा | | ५०० | जिएसटि |
| २०. | पोशि/४६२ सिध्देश देशमुख | गुन्हे शाखा | | ५०० | जिएसटि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पाचारण केले असता आरोपी विरुध्द भौतीक पुरावा गोळा करुनआरोपी निष्पण करण्या मदत झाली. | | |
| २१. | क.तज्ञ/सपोनि श्री.एम.पी.इंगोले | अंगुली मुद्रा कक्ष | दि.०४/१०/२०२४ रोजी राजापेठ हद्दीतील रहीवासी विलास पोवनिकर यांच्या घरी गुन्हा घडला असता मध्ये अंगुली मुद्रा तज्ञ यांना पाचारण केले असता आरोपी विरुध्द भौतीक पुरावा गोळा करुन आरोपी निष्पण करण्यास मदत झाली. | १००० | सीनोट |
| २२. | पोहवा/१०५२ सुधीर गुडधे | गुन्हे शाखा | | ७०० | जिएसटि |
| २३. | पोशि/१५२ गोंविद धनवे | गुन्हे शाखा | | ५०० | जिएसटि |
| २४. | पोशि/४६२ सिध्देश देशमुख | गुन्हे शाखा | | ५०० | जिएसटि |
| २५. | क.तज्ञ/सपोनि श्री.एम.पी.इंगोले | अंगुली मुद्रा कक्ष | पो.स्टे.राजपोठ अप.क्र. ५६३/२०२४ क.३३१ (४), ३०५ (अ) भा.न्या.स.गुन्हा मध्ये अंगुली मुद्रा तज्ञ यांना पाचारण केले असता आरोपी विरुध्द भौतीक पुरावा गोळा करुन आरोपी निष्पण करण्या मदत झाली. | १००० | सीनोट |
| २६. | पोहवा/१०५२ सुधीर गुडधे | गुन्हे शाखा | | १००० | जिएसटि |
| २७. | पोशि/१५२ गोंविद धनवे | गुन्हे शाखा | | ५०० | जिएसटि |
| **एकुण** | | **बारा हजार दोनशे रुपये फक्त** | | **१२,२००/-** | -- |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/लेखा/घबांअ/व्याज कपात/१२७९/२०२५ अमरावती शहर दिनांक ०७/०२/२०२५**

## आदेश

श्रेणी पोउपनि/८३६ संजय माणिकराव उंबरकर नेमणुक शवाशा पश्चिम, अमरावती शहर हे दिनांक ३१/०१/२०२५ रोजी नियम वयोमानाने सेवानिवृत्त झाले असुन यांना उपलब्ध अभिलेखानुसार वित्तीय वर्षे सन २०११-२०१२ मध्ये रुपये ३,२२,५००/- इतके घरबांधणी अग्रीम मंजुर करण्यात आले होते. सदर अग्रीमाची मुद्दल त्यांचे वेतनामधुन नियमितपणे परतफेड केली आह.

सदर सेवानिवृत्त पोलीस अंमलदार यांचे घरबांधणी अग्रीम रुपये ३,२२,५००/- वरील व्याजाची गणना केली असता रुपये १,४०,१०३/- व त्यावरील दंडनिय रक्कम रु.४९,६७८/- असे एकुण **रुपये १,८९,७८१/- (अक्षरी रुपये एक लाख एकोणनव्वद हजार सातशे एक्यांशी फक्त)** वसुल करणे बाकी आहे.

सेवानिवृत्त श्रेणी पोउपनि/८३६ संजय माणिकराव उंबरकर हे दिनांक ३१/०१/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने सदरची रक्कम त्यांना देय असलेल्या **अर्जित रजेचे रोखमुल्य रक्कमेतुन** वसुल करण्यात यावी.

**२.पोआअ/लेखा/घबाअ-व्याज वसुली/१९४९/२०२५ अमरावती शहर दिनांक २१/०२/२०२५**

**संदर्भ :-** शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये खालीलप्रमाणे पोहवा/११४६ शामराव दशरथजी मोरे, नेमणूक फ्रेजरपुरायांचा विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यानुसार त्यांना मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुददलाची कपात पुर्ण झाली असून त्यावरील व्याजाची रक्कम सेवानिवृत्ती उपदानातुन वसुल होणेबाबत विनंती केली आहे.

पोहवा/११४६ शामराव दशरथजी मोरे, नेमणूक फ्रेजरपुरा हे दिनांक ३१/०५/२०२५ ला नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचे घरबांधणी अग्रीमवरील व्याजाची रक्कम व त्यावरील दंडनिय रक्कम खालीलप्रमाणे वसुल करण्यात यावी.

| **मंजुर असलेले घरबांधणी अग्रिम** | **घरबांधणी अग्रिम वरील व्याजाची रक्कम** | **व्याजावरील दंडनिय रक्कम** | **३१/५/२०२५ ला सेवानिवृत्त होत असल्याने व्याजावरील दंडनिय रक्कम कपात करावयाचे हप्ते** | **कपात सुरु करावयाचा महिना** | **घरबांधणी अग्रिम वरील व्याजाची रक्कमेवरील कपात सुरु करावयाचा महिना** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| २,८५,०००/- | १,२२,५२१/- | ४२,४९९/- | रु. १०६२७ X १<br>रु. १०६२४ X ३ | फेब्रुवारी २०२५ | सेवाउपदाना मधून एका हप्त्यात |

तसेच पोहवा/११४६ शामराव दशरथजी मोरे, यांचेकडे शिल्लक असलेले व्याजाची रक्कम रुपये १,२२,५२१/- (अक्षरी रुपये एक लाख बावीस हजार पाचशे एकविस फक्त )शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र. घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र. ७ अन्वये व्याजाची रक्कम त्यांचे **सेवानिवृत्ती उपदानातून** वसुल करण्यात यावी.

**३.पोआअ/लेखा/घबाअ-व्याज वसुली/१५४८/२०२५ अमरावती शहर दिनांक १३/०२/२०२५**

**संदर्भ :-** शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये खालील प्रमाणे नमूद पोलीस अंमलदार यांना मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुददलाची कपात पुर्ण झाली असून त्यावरील व्याजाची रक्कम परिगणना करून वेतनातून वसुल होणेबाबत विनंती केली आहे.

| अ.क्र. | पोलीस अमलदार यांचे नाव पदनाम व नेमणुक | घ.बा.अ वरील व्याज | व्याजावरील दंडनियरक्कम | एकुण व्याजावरील रक्कम | कपात करावयाचे हफते शा.नि. | कपात सुरु करावयाचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पोहवा/११३० दिनेश बापुराव टेवले, नेमणुक गाडगेनगर | २,२४,६००/- | ५९,६१२/- | २,८४,२१२/- (अक्षरी रु.दोन लाख चौऱ्यांशी हजार दोनशे बारा फक्त) | १६७२४ x १<br>१६७१८ x १६ | फेबुवारी २०२५ |
| २ | सपोउपनि/१०१४ मुस्ताकअली अहसानअली सैय्यद नेमणुक नागपुरी गेट | रू. ५५,५४२/- | ३,६४५/- | ५९,१८७/- (अक्षरी रु.एकोणसाठ हजार एकशे सत्यांशी फक्त) | ३९५७ x १<br>३९४५ x १४ | फेबुवारी २०२५ |
| ३ | पोहवा/११५० संजय उत्तमराव लोंधे, नेमणुक खोलापुरी गेट | रु.१,६३,९८९/- | २०,०८९/- | १,८४,०७८/- (अक्षरी रु एक लाख चौऱ्यांशी हजार अठयाहत्तर फक्त) | ७६९१ x १<br>७६६९ x २३ | फेबुवारी २०२५ |

तरी मा.महालेखाकार यांचे आक्षेपाचे तसेच अतिरीक्त रक्कम भरण्याचे अधिन राहून वरीलप्रमाणे नमूद पोलीस अमलदार यांचे कडील शिल्लक घरबांधणी अग्रीमाचे व्याजाची परिगणना करण्यात आली असून त्यांचे माहे ०२/२०२५ चे वेतनातून सदरची कपात सुरु करावी. तथापी वरील नमूद पोलीस अमलदार सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त झाल्यास व व्याजाची रक्कम शिल्लक राहील्यास शानि. वित्तविभागक्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र. घबाअ-२०१९/ प्र.क्र. १४/ २०१९/ विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र. ७ अन्वये व्याजाची रक्कम त्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसुल करण्यात यावी.

**४.पोआअ/लेखा/घबाअ-व्याज वसुली/२१२६/२०२५ अमरावती शहर दिनांक २७/०२/२०२५**

**संदर्भ :-** शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये खालीलप्रमाणे नमूद पोलीस अंमलदार यांना मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुददलाची कपात पुर्ण झाली असून त्यावरील व्याजाची रक्कम परिगणना करून वेतनातून वसुल होणेबाबत विनंती केली आहे.

| **अ.क्र.** | **पोलीस अमलदार यांचे नाव पदनाम व नेमणुक** | **घ.बा.अ वरील व्याज** | **व्याजावरील दंडनियरक्कम** | **एकुण व्याजावरील रक्कम** | **कपात करावयाचे हफते शा.नि.२०.०२.१५** | **कपात सुरु करावयाचा महिना** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | मपोहवा/१०८१ रेखा किसनराव निरगुळे (आठवले), नेमणुक पो.स्टे. कोतवाली. | १,२८,९७०/- | ४४,७३६/- | १,७३,७०६/- | १७३७६ X १<br>१७३७० X ९ | मार्च २०२५ |
| २ | पोहवा/५२७ विलास उत्तमराव खांडेकर, नेमणुक शवाशा पश्चिम | ३,४९,३४८/- | ३५,६६३/- | ३,८५,०११/- | २४०६६ X १<br>२४०६३ X १५ | मार्च २०२५ |

तरी मा. महालेखाकार यांचे आक्षेपाचे तसेच अतिरीक्त रक्कम भरण्याचे अधिन राहून वरीलप्रमाणे नमूद पोलीस अमलदार यांचे कडील शिल्लक घरबांधणी अग्रीमाचे व्याजाची परिगणना करण्यात आली असून त्यांचे माहे ०३/२०२५ चे वेतनातून सदरची कपात सुरु करावी. तथापी वरील नमूद पोलीस अमलदार सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त झाल्यास व व्याजाची रक्कम शिल्लक राहील्यास शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र. घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र. ७ अन्वये व्याजाची रक्कम त्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसुल करण्यात यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस